मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महानगरपालिकेचा "सारथी" ठरला देशात "सिल्व्हर अॅवॉर्ड" चा मानकरी

## डिस्ट्रीक्ट लेव्हल इनिशिएटीव्ह्ज इन ई-गव्हर्नन्स या श्रेणीमध्ये सिल्व्हर पुरस्कार जाहीर : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह मुंबई येथे पुरस्कार स्विकारणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व स्मार्ट सिटीच्या "पीसीएमसी स्मार्ट सारथी" या प्रकल्पाला केंद्र शासनाचा 'ई-गव्हर्नन्स स्कीम २०२३-२४' अंतर्गत डिस्ट्रीक्ट लेव्हल इनिशिएटीव्ह्ज इन ई-गव्हर्नन्स'(ई-प्रशासनामध्ये जिल्हास्तरीय उपक्रम) या श्रेणीमध्ये सिल्व्हर पुरस्कार जाहीर झाला आहे. मुंबई येथे महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह हे मंगळवारी हा पुरस्कार स्वीकारणार आहेत.

केंद्र शासनाच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या वतीने हा पुरस्कार दिला जाणार आहे. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख पाच लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबई येथे होणाऱ्या २७ व्या राष्ट्रीय ई-प्रशासन परिषदेमध्ये (एसीईजी) महापालिकेला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.




### ऑनलाइन कर भरणा

» पीसीएमसी स्मार्ट सारथीच्या नोंदणीकृत वापरकर्त्यांना मालमत्ता कर आणि पाणी कर यांसारख्या कर भरण्याच्या सूचना प्राप्त होतील. नागरिक कर देयकांची संपूर्ण स्थिती पाहू शकतो. याव्यतिरिक्त, नागरिक अॅप आणि वेब पोर्टलमधील कर पेमेंट विभागाद्वारे पेमेंट्सचे परीक्षण आणि ट्रॅक करू शकतात. ऑनलाइन पेमेंट करू शकतात.

महापालिकेच्या वतीने पीसीएमसी स्मार्ट सारथीच्या माध्यमातून नागरिकांना अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रशासनामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर केल्यामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेला राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या वतीने हा पुरस्कार दिला जाणार आहे महापालिकेला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### नागरिकांचा सहभाग

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नागरिकांपर्यंत माहितीचा सातत्यपूर्ण आणि वेळेवर प्रवाह राखण्यासाठी पीसीएमसी स्मार्ट सारथीने परस्पर संवादाचे सुधारित मार्ग खुले केले आहेत. शिवाय, पीसीएमसी स्मार्ट सारथी ऍप्लिकेशनने नागरिकांना गरजेच्या वेळी मदत करणे किंवा सामाजिकरित्या व्यस्त राहणे, मनपाद्वारे आयोजित क्रियाकलापांसाठी जबाबदार बनणे सोपे केले आहे

देशातील १०० स्मार्ट शहरांनी गतिशीलता, ऊर्जा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक जागा, सामाजिक पायाभूत सुविधा आणि स्मार्ट गव्हर्नन्सचे विस्तृत प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पांना प्रोस्ताहन देण्यासाठी स्मार्ट सिटीज मिशनच्या अंतर्गत, इंडिया स्मार्ट सिटीज अवॉर्ड कॉन्टेस्ट (आय.एस.ए.सी.)उपक्रम हाती घेतला आहे.

पिंपरी चिंचवड "स्मार्ट सारथी अॅप" डिजिटल नागरिकत्वाच्या दिशेने एक दूरदर्शी उपक्रम "पीसीएमसी स्मार्ट सारथी" हे पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि.चे अधिकृत मोबाईल ऍप्लिकेशन आणि वेब पोर्टल आहे. पीसीएमसी स्मार्ट सारथी डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे ई-गव्हर्नन्स, समुदाय प्रतिबद्धता समाविष्ट करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी सादर करण्यात आली आहे. याद्वारे विविध सेवा देण्याचे काम सध्या सूरू आहे.

# गणेशमूर्ती स्टॉलसाठी महानगरपालिकेची परवानगी आवश्यक

## केवळ पर्यावरणपूरक मूर्तींचे उत्पादन व विक्री करण्यास परवानगी, पीओपी मूर्तींची विक्री करणाऱ्यांवर कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड: महापालिका कार्यक्षेत्रात केवळ पर्यावरणपूरक मूर्तींचे उत्पादन व विक्री करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महापालिकेच्या उद्योगधंदा व परवाना विभागाशी संपर्क साधून गणेश मूर्ती स्टॉलबाबत परवानगी घेऊन परवानगीची एक प्रत पर्यावरणपूरक मूर्ती विक्रीचे दुकान किंवा स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक असणार आहे, अशी माहिती पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी दिली.



केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पीओपी मूर्ती उत्पादनावर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे महापालिका कार्यक्षेत्रातील मूर्ती बनवणारे कारागीर, मूर्तिकार व उत्पादक यांना पीओपीपासून मूर्ती बनवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका आणि शहरातील नागरिकांनी नेहमीच पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यास प्राधान्य दिले आहे. आपले पिंपरी-चिंचवड पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित राहील याची दक्षता घेण्याची जबाबदारी ही शहरातील प्रत्येक नागरिकाची आहे. त्या दृष्टीने नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा.

> "गणेशोत्सव, नवरात्रौत्सवाच्या काळात शहरातील मूर्ती तयार करणारे कारागीर, मूर्तिकार तसेच उत्पादकांनी केवळ शाडूमातीच्या मूर्तींची निर्मिती किंवा विक्री करावी. नागरिकांनीही केवळ पर्यावरणपूरक शाडूमातीच्या गणेशमूर्ती तसेच पर्यावरणपूरक सजावटीचे, पूजा साहित्य वापरून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा.
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# वैद्यकीय महाविद्यालयांच्या नफेखोरीला चाप

## शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) या महाविद्यालयांना 50 हजारांपेक्षा अधिक शुल्क आकारता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशावेळी अनामत रक्कम (कॉशन मनी) म्हणून विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये उकळणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांना आता मोठा चाप बसला आहे. शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) या महाविद्यालयांना ५० हजारांपेक्षा अधिक शुल्क आकारता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. एफआरएने वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी अनामत रक्कम ठरविली असून, ती रक्कम शिक्षण संपल्यानंतरही ९० दिवसांमध्ये विद्यार्थ्यांना परत करणे अनिवार्य आहे.

यासंबंधीचे परिपत्रक “एफआरए”चे सदस्य सचिव एस. राममूर्ती यांनी प्रसिद्ध केले आहे. राज्यातील एमबीबीएस अभ्यासक्रमाचे काही महाविद्यालये ८ ते १० लाख रूपये शैक्षणिक शुल्कासोबतच अनामत रकमेसोबतच होस्टेल, ग्रंथालय, प्रयोगशाळा, मेस आदींसाठी एकूण पाच लाखांपेक्षा अधिक रक्कम आकारतात. ही सुरक्षा ठेव साधारण साडेचार वर्षांसाठी ठेवण्यात येते.



### नव्या नियमावलीतील ठळक मुद्दे

- प्रवेशावेळी रक्कम भरण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ द्यावा
- रक्कम भरण्याची जबरदस्ती करता येणार नाही.
- ही रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवावी लागेल. व्याजाची रक्कम उत्पन्नाचे साधन म्हणून दर्शवावी लागणार.
- याची सर्व माहिती “एफआरए”कडे द्यावी लागेल.
- रकमेची माहिती बँक खाते तसेच अकाउंट बुकमध्ये दर्शवावी लागेल.

या रक्कमेवरील व्याजाची रक्कम महाविद्यालय प्रशासन आपल्याकडे ठेवत असून, त्याद्वारे नफा कमवत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. मात्र, त्याचा उल्लेख कुठेही महाविद्यालय प्रशासनाकडून आपल्या जमा-खर्चाच्या यादीत नमूद करण्यात येत नाही. त्याचप्रमाणे ही रक्कमही महाविद्यालय विद्यार्थ्यांना लवकर परत करीत नाही. याबाबत तक्रारी आल्यानंतर “एफआरए”ने हा निर्णय घेतला आहे.

“एफआरए”ने एमबीबीएस, एमडी, एमएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीएस्सी नर्सिंग अशा १६ वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी अनामत रक्कम किंवा इतर शुल्क म्हणून रक्कम ठरवून दिली आहे. या नियमाची अंमलबजावणी न करणाऱ्या कॉलेजांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा एफआरएने दिला आहे.

राज्य सरकारने तयार केलेल्या महाराष्ट्र शैक्षणिक संस्था-शैक्षणिक शुल्क विनियमन अधिनियमन कायद्याला राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी मंजुरी दिली आहे. यामुळे राज्यातील शिक्षण सम्राटांना चाप बसेल, अशी आशा व्यक्त केली जाऊ लागली आहे. गेल्या काही वर्षात राज्यात शिक्षण सम्राटांनी सहकार सम्राटांना आमदनीबाबत मागे टाकले आहे. शिक्षण संस्थांना विद्यार्थ्यांकडून किती शुल्क घ्यायचे, यावर मर्यादा नसल्याने शिक्षण सम्राटांच्या नफेखोरीला चांगलाच ऊत आला आहे. बालवाडीपासून अभियांत्रिकी, वैद्यकीय, पदवी शिक्षणापर्यंत शिक्षण सम्राटांकडू न विद्यार्थी आणि पालकांना भरमसाठ शुल्काद्वारे लुबाडले जात आहे. शिक्षण सम्राटांच्या या मुजोरीला राज्य सरकारच्या कायद्यामुळे आळा बसेल, अशी आशा व्यक्त केली जात असली तरी या कायद्याची राज्य सरकारच्या संबंधित यंत्रणेकडून किती परिणामकारकतेने अंमलबजावणी होते, हे पाहणेही महत्त्वाचे आहे.

### 26 ऑगस्टपासून बुजवलेले खड्डे

- एमबीबीएस, एमडी, एमएस, डीएम – ५०,०००
- बीडीएस (यूजी, पीजी) – ४०,०००
- बीएएमएस, बीएचएमएस (यूजी, पीजी) – २५,०००
- बीयूएमएस (यूजी, पीजी) – १०,०००
- बीपीटीएच, एमपीटीएच – २०,०००
- बीएस्सी, एमएस्सी नर्सिंग – १०,०००

# लोहमार्गाच्या दुहेरीकरणचे काम अंतिम टप्प्यात; नव्या ट्रेन्सची अपेक्षा

## मंडळ मागील वर्षाप्रमाणे यंदाही दुपारी 4 वाजताच विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणार आहे, दगडूशेठ गणपती ट्रस्टचा हा निर्णय यापुढे कायम रहाणार आहे,

**पिंपरी | प्रतिनिधी**

रेल्वे मार्गांचा विस्तार व्हावा, ट्रेन्सची संख्या वाढावी, प्रवाशांच्या वेळेची बचत व्हावी यासाठी मध्य रेल्वेकडून बहुतांश लोहमार्गांचे दुहेरीकरण सुरू आहे. त्यामध्ये पुणे-मिरज या २८० किलोमीटर लोहमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. आतापर्यंत झालेल्या कामामुळे ट्रेन्सचा वेगही वाढला, मात्र गाड्यांची संख्या वाढली नसल्याचे चित्र आहे.

या मार्गावरून दिवसाला सहाच एक्स्प्रेस आणि तीन लोकल ट्रेन धावतात. त्यामुळे हजारो कोटींचा खर्च करून मार्ग तयार केला, पण मार्गावर गाड्याच नसतील तर प्रवाशांची गैरसोय कधी टळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



मध्य रेल्वेने चार हजार ८८२ कोटी रूपये खर्च मंजुरी देत पुणे-मिरज या २८० किलोमीटर रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरण आणि विद्युतीकरणाचे कामाला २०१६ मध्ये सुरू केले. हे काम मे २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, काही ठिकाणच्या भूसंपदनामुळे आणि करोना स्थितीमुळे कामाला विलंब झाला.

दरम्यान, जुन्या रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. तर तारगाव-मसूर व मसूर-शिरवडे अशा दोन टप्प्यांतील १८ किलोमीटरचे दुहेरीकरण पूर्ण झाल्याने शिरवडे ते तारगाव दरम्यान वेगाच्या चाचणीत जास्तीत जास्त १३० किलोमीटर प्रतितास वेग गाठण्यात आला. ही चाचणी यशस्वी झाल्याने सुरक्षा आयुक्तांनी या मार्गावरून ताशी ९० किलोमीटर वेगाने गाड्या चालविण्यास मान्यता दिली आहे.

उर्वरित ६३ किलोमीटर मार्गाच्या दुहेरीकरणास आणखी सहा महिने कालावधी लागणार आहे. तयार झालेल्या २१७ किलोमीटर दुहेरी मार्गावरून माल व प्रवासी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. सध्या या मार्गाचे दुहेरीकरण काम ८७ टक्के पूर्ण झाले आहे. त्यामुळे तातडीने या मार्गावर गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

### पुणे मिरज दुहेरीकरण मार्गाच्या कामाची माहिती

- पुणे मिरज रेल्वे मार्गाची एकूण लांबी- २७९.०५ किलोमीटर
- दुहेरीकरण पूर्ण – १७४.८५ किलोमीटर (६२.६५ टक्के)
- प्रकल्पाची एकूण किंमत- ४८८२.५३ कोटी
- आजपर्यंतचा खर्च- ३२०० कोटी (६५.५३ टक्के)
- आतापर्यंत करण्यात आलेल्या कामाची प्रगती- ८७ टक्के

# बांधकाम प्रकल्पांना एसटीपी बंधनकारक

## पालिका, पोलीस प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची पार पडली बैठक : शांतता कमिटी सदस्यांनीही लावली बैठकीस हजेरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवीन बांधकामांसाठी राज्य सरकारने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली तयार केली आहे. त्यानुसार बांधकाम परवानगी देताना प्रकल्पाच्या आवारात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे.

तसेच केंद्र सरकारच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या परिपत्रकानुसार २० हजार चौरस मीटरपेक्षा मोठ्या बांधकाम प्रकल्पांना संपूर्ण सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बंधनकारक आहे. शिवाय, त्या पाण्याचा पुनर्वापर करायचा आहे. त्यानुसार, कार्यवाही सुरू केली आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे परवानगीसाठी येणाऱ्या २० हजार चौरस मीटरपेक्षा कमी बांधकाम क्षेत्राच्या प्रकल्पांना सांडपाणी वाहिन्या जोड (ड्रेनेज कनेक्शन) दिले जाणार आहेत. मात्र, घरगुती सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर प्रकल्प (ग्रे वॉटर ट्रिटमेंट अ‍ॅण्ड रिसायल प्लँट) कार्यान्वित ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार, जलनिःसारण विभागामार्फत बांधकाम परवानगीसाठी आवश्यक सांडपाणी जोड (ड्रेनेज कनेक्शन) दाखला, पूर्वपरवानगी दाखला, तसेच ड्रेनेज पूर्णत्वाचा ना-हरकत दाखला देण्यात येतो.



### प्रभावी अंमलबजावणीसाठी

-अभियांत्रिकी विभागाकडे बांधकाम परवानगीसाठी आवश्यक जलनिःसारणासाठी पूर्वपरवानगी ना-हरकत दाखल्यासाठी अर्ज सादर करणे

-छाननी करून मैलाशुद्धीकरण केंद्राचे डिझाईन बेसिस रिपोर्ट, नकाशे व प्रकल्पातील मैला शुद्धीकरण केंद्राचे स्थान तपासणे

-बाबींच्या तपासणीनंतर मैलाशुद्धीकरण केंद्राचे डिझाईन व क्षमता ही प्रकल्पातील निवासी व व्यापारी वापरासाठी पुरेशी खात्री करणे

-मैलाशुद्धीकरण केंद्राची क्षमता, तंत्रज्ञानातील उपकरणे, प्रकल्पासाठी पूर्वपरवानगी ना-हरकत दाखला देणे, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर विकसक किंवा बांधकाम व्यवसायिकांकडून भाग पूर्णत्व किंवा पूर्णत्व मिळणे.

### अर्ज सादर केल्यानंतर होणार कार्यवाही

- दाखल्यानुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकाम झाल्याची खात्री करणे

- बांधलेला मैलाशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेचा व तांत्रिकदृष्ट्या तपासून त्याबाबत शासकीय त्रयस्थ संस्थेमार्फत अहवाल घेणे

-केंद्राच्या नकाशातील स्थान पूर्वपरवानगी ना-हरकत दाखल्यानुसार असल्याचे तपासणे

-बसविलेली उपकरणे योग्य क्षमतेची, दर्जाची असल्याची खात्री करणे, प्रकल्पाच्या आवारातील ध्वनी तीव्रता ५५ डीसीबलपेक्षा कमी असल्याची खात्री करून ना-हरकत दाखल्याची कार्यवाही करणे

-होणाऱ्या सांडपाण्याची गुणवत्ता राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार असल्याची तपासणी करणे

-केंद्राच्या प्रक्रिया केलेल्या पाण्याची गुणवत्ता तपासणीसाठी ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टीम बसविणे बंधनकारक

-तपासणीनंतर आवश्यकतेनुसार काही बदल असल्यास त्यांची पूर्तता झाल्यानंतर पूर्णत्व ना-हरकत दाखला देणे.

### ..तर ड्रेनेज कनेक्शन मिळणार नाही

» शहरातील २० हजार चौरस मीटरपेक्षा मोठे बांधकाम क्षेत्र असणाऱ्या प्रकल्पांना महापालिकेकडून ड्रेनेज कनेक्शन दिले जाणार नाही. या प्रकल्पांच्या आवारात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर संपूर्ण प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे. अशा बांधकाम प्रकल्पांना महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत मैलाशुद्धीकरण केंद्राचे नकाशे, डिझाईन व तांत्रिक बाबी तपासून बांधकाम परवानगीसाठी आवश्यक पूर्वपरवानगी व पूर्णत्वाचा दाखला देण्यात येतो.

# रस्त्यांवरील खड्ड्यांची जबाबदारी ठरवणारा निर्णय

## अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणार असल्याची आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : अवघ्या आठ दिवसात 888 खड्डे

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात अवघ्या आठ दिवसात ८८८ खड्डे आढळले आहेत. त्यामुळे पुढील वर्षीपासून कंत्राटदार, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित केली जाणार असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवडमध्ये पावसामुळे मुख्य व अंतर्गत रस्त्यांची चाळण झाली आहे. रस्त्यावर खड्डेच-खड्डे पडले आहेत. अवघ्या आठ दिवसात ८८८ खड्डे आढळले आहेत. त्यामुळे पुढील वर्षीपासून याची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. शहरात एकूण ३५४२ खड्डे आढळले होते. त्यापैकी २८३८ खड्डे बुजविले आहेत. ७०४ खड्डे बुजविण्याचे बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.



शहरात यंदा जुलैअखेर पावसाला सुरुवात झाली. जुलै आणि ऑगस्टच्या पहिल्या पंधरवाड्यात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शहरातील रस्त्यांची चाळण झाली होती. रस्त्यावर खड्डेच-खड्डे पडले होते. यंदा सर्वाधिक खड्डे असल्याची कबुलीही महापालिका प्रशासनाने दिली होती. त्यानंतर पालिकेने खड्डे बुजवले. मात्र, मागील आठ दिवसात शहरात पुन्हा जोरदार पाऊस झाला. त्यामुळे रस्त्यांची चाळण झाली. शहरातील पिंपरी, चिंचवड, निगडी, भोसरी, नवी सांगवी, जुनी सांगवी, वाकड, ताथवडे, पुनावळे, थेरगाव, चिखली, आकुर्डी, परिसरातील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. आठ दिवसात ८८८ खड्डे आढळले. आता दोन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने खड्डे बुजविण्याचे काम सुरू झाले आहे.

शहरात २७ ऑगस्टपर्यंत ३५४२ खड्डे आढळले होते. त्यापैकी महापालिकेने डांबर आणि कोल्ड मिक्सने १०३२, खडीने ३०२, पेव्हिंग ब्लॉकने १२४२, सिमेंट कॉंक्रिटने २६२ असे २८३८ खड्डे पूर्णतः बुजविले आहेत. खड्डे बुजवण्याचे प्रमाण ८०.१२ टक्के आहे. शहरातील केवळ ७०४ खड्डे बुजविण्याचे काम बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. मात्र, शहरातील रस्त्यांवर सर्वत्र खड्डेच-खड्डे दिसून येत आहेत. तसेच 'जेट पॅचर' मशिनच्या माध्यमातून खड्डे बुजविण्याचे काम वेगात सुरू आहे. लवकरच खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण होईल. शहरात दोन हजार किलोमीटर अंतराचे रस्ते आहेत. मागील वर्षी रस्ता झाला आणि पावसाळ्यात त्यावर खड्डे पडले. पुढील वर्षीपासून कंत्राटदार, उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित केली जाणार असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

### खडीमुळे अपघात

» खड्ड्यांमध्ये पाणी साचून राहते. त्यामुळे वाहनचालकांना खड्ड्याचा अंदाज येत नाही. वाहन खड्ड्यात आदळून चालकाला तसेच वाहनाला दणका बसत आहे. खड्ड्यांतून सुट्या झालेल्या खडीमुळे दुचाकी घसरून अपघात होत आहेत. खड्ड्यांपासून बचावासाठी वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. परिणामी, वाहतुक संथ गती येत आहे. कोंडीत भर पडत आहे.

# राज्यातील प्रत्येक माणूस सुखी, समृद्ध, आनंदी होऊ दे

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली

**पुणे | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. राज्यात सर्वत्र चांगला पाऊस आहे, शेतात उदंड पीक येऊ दे; राज्यातील बळीराजा सुखी व समृद्ध होऊ दे. सर्व विभागातील प्रत्येक माणूस सुखी, समृद्ध, आनंदी होऊ दे, अशी प्रार्थना भीमाशंकराकडे केल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

पुजेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा भीमाशंकर देवस्थान ट्रस्टच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, माजी आमदार शरद सोनवणे आदी उपस्थित होते.



भीमाशंकराचे दर्शन घेतल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, राज्यातून येणाऱ्या भाविकांना येथे दर्शनाचे भाग्य लाभते. मी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्रावणी सोमवारी दर्शनासाठी आलो आहे. दर्शनानंतर अभिषेक झाल्यानंतर मनाला समाधान वाटते. ही वास्तू प्राचीन असून येथून सकारात्मक उर्जा मिळते. यावेळी देवाला साकडे घालताना राज्यातील संपूर्ण जनता भीमाशंकराच्या आशीर्वादाने सुखी, समृद्ध होऊ दे, आयुष्यात चांगले दिवस येऊ दे, त्यांच्या जीवनात परिवर्तन येऊ दे; सुखाचे, समाधानाचे आणि आनंदाचे दिवस त्यांच्या कुटुंबात येऊ दे, अशी प्रार्थना केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

महाराष्ट्र प्रगत राज्य असून आपण राज्यात अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुलींना मोफत व्यावसायिक उच्च शिक्षण, ज्येष्ठ नागरिकांसाठी योजना आदी कल्याणकारी योजना राबवत आहोत. एकीकडे कल्याणकारी योजना आणि एकीकडे विकास अशी सांगड घालण्याचा आम्ही प्रयत्न करतोय. असेच काम चालू ठेवण्यासाठी ताकद, प्रेरणा आणि ऊर्जा द्यावी, अशी प्रार्थना केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.



याप्रसंगी खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, जुन्नर -आंबेगाव चे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, खेडचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, खेड तहसीलदार तथा देवस्थानच्या कार्यकारी विश्वस्त ज्योती देवरे, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थानचे अध्यक्ष ॲड. सुरेश कौदरे, विश्वस्त मधुकर गवांदे, दत्तात्रय कौदरे, रत्नाकर कोडीलकर, सरपंच दत्तात्रय हिले आदी उपस्थित होते.



# कॉपीमुक्त परीक्षेसाठी तिसरा डोळा अनिवार्य

## परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही नसल्यास मान्यता होणार रद्द : राज्याच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतली कठोर भूमिका

**पुणे | प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभागाने शाळांमध्ये सीसीटीव्ही बंधनकारक असल्याचा निर्णय घेतल्यानंतर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानेही आता प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरा अनिवार्य केला आहे.

दिवाळीनंतर बोर्डाच्या पथकाकडून राज्यात सर्वच पीक्षा केंद्रांची तपासणी होणार असून सीसीटीव्ही नसलेल्या केंद्रांची मान्यता रद्द होणार आहे. परीक्षेचे रेकॉर्डिंग सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून होणार असल्याने परीक्षा कॉपीमुक्त होतील, असा विश्वास बोर्डाने बोलताना व्यक्त केला आहे.



दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेसाठी नऊ विभागीय मंडळाअंतर्गत राज्याच्या चार ते पाच हजार केंद्रे आहेत. बोर्डाने कॉपीमुक्त परीक्षेसाठी मागील वर्षापासून विद्यार्थ्यांची सरमिसळ पद्धत सुरू केली आहे. पण ज्या केंद्रांच्या एक ते तीन किलोमीटर अंतरावर दुसरे परीक्षा केंद्र नाही, त्या ठिकाणी ही पद्धत नव्हती. आता आगामी परीक्षा वेळी सर्वच केंद्रांसाठी ही पद्धत अवलंबली जाणार आहे.

आता बोर्डाने घेतलेल्या निर्णयानुसार, परीक्षा केंद्रातील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरा राहणार असल्याने तेथील प्रत्येक हालचाल बोर्डाच्या अधिकाऱ्यांना पाहायला मिळणार आहे. त्यामुळे आता संपूर्ण परीक्षा कॉपीमुक्त होईल, असा विश्वास बोर्डाच्या अधिकाऱ्यांना आहे.

### बारावीची परीक्षा 11 फेब्रुवारीपासून

» ऑगस्टअखेर दहावी व बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक निश्चित होणार आहे. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी व बारावीच्या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे, त्यानुसार, २३ ऑगस्टपर्यंत हरकती मागवल्या असून त्यानंतर काही दिवसात वेळापत्रक जाहीर होईल. सध्याच्या वेळापत्रकानुसार बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या काळात होणार आहे. या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक आणि तोंडी परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारीपर्यंत होईल. दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या काळात होईल. या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा ३ ते २० फेब्रुवारीपर्यंत होणार आहे.

“ दहावी आणि बारावीच्या परीक्षेचे केंद्र असलेल्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा असायलाच पाहिजे. त्यानुसार सर्व केंद्रांना आदेशित केले असून दिवाळीनंतर प्रत्येक केंद्राची नेहमीप्रमाणे पडताळणी होईल. त्यावेळी सीसीटीव्ही चालू स्थितीत आहेत की नाही, याची तपासणी करण्यात येणार आहे.

**- औदुंबर उकिरडे, अध्यक्ष, एचएससी बोर्ड, पुणे विभागीय मंडळ.**